# स्थानिक गुन्हे शाखा, नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण, आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांक :- ०३/१०/२०१८

## त्रंबकरोडवर पुणे येथील व्यापा-यांची लुटमार करणारे दरोडेखोर १२ तासात जेरबंद

## स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाची कामगिरी

---

दिनांक ०२ ऑक्टोबर २०१८ रोजी पुणे जिल्हयातील जुनी सांगवी येथील रहिवासी श्री. रिकी नरेश अग्रवाल व श्री. मदनमोहन बाबुलाल अग्रवाल तसेच त्यांचेसोबत मुंबई येथील प्रकाश भडाले असे त्यांचेकडील मारुती रिटझ् कारने त्रंबकेश्वर येथे दर्शनासाठी आले होते. त्रंबकेश्वर येथुन दर्शन घेवुन तिघेही परतीचे मार्गावर असतांना दुपारचे सुमारास नाशिक त्रंबक महामार्गावर खंबाळे फाटा परिसरात श्री. मदनमोहन अग्रवाल हे नैसर्गिक विधीसाठी थांबलेले असतांना, ०२ मोटर सायकलवर आलेले अज्ञात ४ ते ५ आरोपीतांनी त्यांना व त्यांचे साथीदारांना लाकडी दांडयाने जबर मारहाण करून त्यांचे खिशातील रोख व मोबाईल फोन, तसेच कारचे डॅशबोर्डमध्ये ठेवलेली रोख रक्कम असा एकुण ०२ लाख ६० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जबरीने लुटमार करून नेला होता. सदर बाबत **त्रंबकेश्वर पोलीस ठाणेस I गुन्हा रजि.नं. १००/२०१८ भादवि कलम ३९५** प्रमाणे तात्काळ गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर घटनेबाबत नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो**. व अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड सो.** यांनी तात्काळ दखल घेवुन गुन्हा उघडकीस आणणेसाठी मार्गदर्शन करून सुचना दिल्या. त्याप्रमाणे **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.अशोक करपे** यांनी स्थागुशाचे पथकास तात्काळ घटनास्थळी पाचारण केले व फिर्यादी श्री. रिकी अग्रवाल यांचेकडेस घडले प्रकाराबाबत विचारपुस केली, तसेच सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीतांचा कसोशिने शोध घेणेसाठी स्थागुशाचे तपास पथकास सुचना दिल्या. सदर गुन्हयाचे कार्यप्रणालीवरून गुन्हा करणारे आरोपी हे आजुबाजूचे परिसरातील असल्याचा तर्क लावुन, स्थागुशाचे तपास पथकास नाशिक शहरात तात्काळ पाचारण केले. दरम्यान स्थागुशाचे पथक सदर गुन्हयाचे समांतर तपासात सातपुर परिसरात असतांना, खब-यामार्फत मिळालेल्या गुप्त बातमीचे आधारे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी पिंपळगाव बहुला शिवारात सापळा रचुन **संशयीत इसम नामे १) नवनाथ गंगाराम झुरडे**, वय ३०, **२)अनिल सोनु गुंबाडे**, वय ३१, **३) लक्ष्मण छबु गुंबाडे**, वय ३२, सर्व रा. भवानी चौक, पिंपळगाव बाहुला, ता.जि.नाशिक यांना शिताफिने ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले संशयीतांना पोलीस खाक्या दाखविताच त्यांनी त्यांचे **साथीदार नामे ४) योगेश दादु पगारे**, रा. जाधव संकुल, सातपुर, **५) बाबा पुर्ण नाव माहित नाही**, रा. त्रंबकेश्वर यांचेसह सदर गुन्हा केल्याची कबुली दिली आहे.

वरील गुन्हयाचे समांतर तपासात ताब्यात घेतलेले आरोपीतांना अधिक विश्वासात घेवुन चौकशी केली असता, सदर गुन्हयातील फिर्यादी श्री. रिकी अग्रवाल यांचेसह मुंबई येथुन **सोबत आलेला इसम नामे प्रकाश भडाले** याचाही **गुन्हयात सहभाग असल्याचे तपासात निष्पन्न** झाले. त्यानुसार संशयीत **६) प्रकाश वसंत भडाले,** वय ३६, रा. चेंबुर, अजितबाग, मुंबई-७४ यास पथकाने तात्काळ ताब्यात घेतले. संशयीत प्रकाश भडाले याचेकडे चौकशी केली असता, त्याने यातील फिर्यादी रिकी अग्रवाल व त्यांचे काका मदनलाल अग्रवाल हे दोघेजण मोठे व्यापारी असुन त्यांचेकडे भरपुर पैसे असतात व ते **त्रंबकेश्वर येथे दर्शनासाठी येणार असल्याची** बातमी त्याचे पिंपळगाव बाहुला येथील साथीदारांना दिली, त्याप्रमाणे वरील आरोपीतांनी प्रकाश भडाले याचेसह संगनमताने लुटमार करण्याचा प्लॅन केला. दरम्यान फिर्यादी रिकी अग्रवाल व त्यांचे काका मदनलाल अग्रवाल हे दर्शन घेवुन परतीचे मार्गावर असतांना प्रकाश भडाले याचे पिंपळगाव बाहुला येथील साथीदारांनी त्रंबकरोडवरील खंबाळे फाटा परिसरात फिर्यादी रिकी व त्याचे काका मदनलाल यांना लाकडी दांडयाने बेदम मारहाण करून त्यांचेकडील रोख रक्कम व मोबाईल फोन लुटमार केली तसेच संशय येवु नये म्हणुन प्रकाश भडाले याने त्याचा स्वत:चा मोबाईल फोनही लुटमार करण्यास त्याचे साथीदारांना सांगितले. वरील आरोपी प्रकाश भडाले याने त्याचे पिंपळगाव बाहुला येथील साथीदारांशी वेळोवेळी संपर्कात राहुन पुर्वनियोजित कट करून लुटमार केली असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने सदर गुन्हा घडलेनंतर **१२ तासाचे आत आरोपीतांना ताब्यात घेवुन गुन्हा उघडकीस** आणलेला आहे. सदर गुन्हयात आरोपीतांनी वापलेली **हिरो पॅशन प्लस मोटर सायकल, ०५ मोबाईल फोन** व मारहाण करणेसाठी वापरलेले लाकडी दांडे असा एकुण ३३,५००/- रू. किं.चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ताब्यात घेतलेले आरोपीतांना जप्त मुद्देमालासह त्रंबकेश्वर पोलीस ठाणेस हजर करण्यात आले असुन त्यांचे फरार साथीदारांचा स्थागुशाचे पथक शोध घेत आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** व अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड सो.** यांनी केलेले मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे,** सहा.पोलीस निरीक्षक **श्री.आशिष आडसुळ,** पोउनि श्री. **मच्छिंद्र रणमाळे,** सपोउनि रामभाउ मुंढे, पोहवा राजु दिवटे, प्रकाश तुपलोंढे, हनुमंत महाले, पोना वसंत खांडवी, जालिंदर खराटे, पोकॉ लहु भावनाथ, हेमंत गिलबिले, प्रदिप बहिरम, चालक योगेश गुमलाडु यांचे पथकाने १२ तासाचे आत सदर दरोडयाचा गुन्हा उघडकीस आणलेला असुन मा.पोलीस अधीक्षक सो यांनी तपास पथकास दहा हजार रुपये बक्षिस जाहिर केले आहे.